15-05-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 5/14/2025 10:12 PM Page 1


'माझी बस' योजना उद्यापासून बंद
पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com


आयपीएलचा अंतिम सामना अहमदाबादमध्ये होण्याची शक्यता
पान ४ वर

वेर्णा, गुरुवार, १५ मे २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 252 | Verna, | facebook.com/dainikherald | Thursday 15 May 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### शोपियानमध्ये शस्त्रास्त्रांचा साठा जप्त

**नवी दिल्ली, दि. १४ :** भारत आणि पाकिस्तानमधील युद्धबंदीनंतरही सुरक्षा दलांचे ऑपरेशन सुरूच आहे. जम्मू आणि काश्मीरमधील शोपियान जिल्ह्यातील केलरमध्ये बुधवारी मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा जप्त करण्यात आला. यामध्ये के-४७ बंदूक, हँडग्रेनेड, हजारो गोळ्यांसह अनेक प्रकारच्या बंदुका समाविष्ट आहेत.
१३ मे रोजी केलरमध्ये सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत लष्कर-ए-तैयबा (एलईटी) चे तीन दहशतवादी मारले गेले. शोपियान जिल्ह्यातील केलरच्या शुक्रू वन परिसरात मंगळवारी दुपारी ४.३० वाजता ही चकमक संपली. त्याला ऑपरेशन केलर असे नाव देण्यात आले. ठार झालेल्या दहशतवाद्यांमध्ये लष्कर-ए-तैयबाचा टॉप कमांडर शाहिद अहमद कुट्टीचाही समावेश होता.

---

### गाझामधील ५ लाख लोक उपासमारीच्या संकटात

**गाझा, दि. १४ :** गेल्या १९ महिन्यांपासून गाझामध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे ५ लाख लोक उपासमारीच्या धोक्यात आहेत. इस्त्रायलने गेल्या तीन महिन्यांपासून गाझा पट्टीला धान्य पुरवठ्यावर बंदी घातली आहे. १२ मे रोजी संयुक्त राष्ट्रांनी गाझातील परिस्थितीवर एक अहवाल सादर केला. यानुसार, जर इस्त्रायलने निर्बंध हटवले नाहीत तर गाझामधील प्रत्येक पाच लोकांपैकी एक उपासमारीला बळी पडू शकतो. याशिवाय २१ लाख लोकांना दुष्काळाचा सामना करावा लागू शकतो. मार्च २०२५ मध्ये इस्त्रायलने गाझाला अन्न आणि इंधन पुरवठा थांबवण्याचा निर्णय घेतला. इस्त्रायली सरकारने दावा केला की यामुळे हमास कमकुवत होईल.
ऑक्टोबर २०२३ मध्ये सुरू झालेल्या इस्त्रायल-हमास संघर्षात आतापर्यंत ६१ हजारांहून अधिक लोक मारले गेले आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक अन्न कार्यक्रमाने म्हटले आहे की त्यांच्याकडे अन्नसाठा संपला आहे. बहुतेक बेकरी आणि देणगीने चालवल्या जाणाऱ्या स्वयंपाकघरे बंद पडली आहेत.
गाझा येथील संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक अन्न कार्यक्रमाचे संचालक अँटोइन रेनार्ड यांच्या मते, या भागातील लोकसंख्येला पुरविण्यासाठी आवश्यक असलेले अन्न इस्त्रायल, इजिप्त आणि जॉर्डनमधील गोदामांमध्ये पडून आहे.

---

### अनिता आनंद कॅनडाच्या परराष्ट्र मंत्री

**ओटावा, दि. १४ :** भारतीय वंशाच्या अनिता आनंद यांना कॅनडाचे नवे परराष्ट्र मंत्री बनवण्यात आले आहे. मंगळवारी त्यांनी पदाची शपथ घेतली. कॅनडामध्ये २८ एप्रिल रोजी सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान झाले. लिबरल पार्टी आणि पंतप्रधान मार्क कार्नी यांनी हे जिंकले. या निवडणुकीत भारतीय वंशाचे २२ उमेदवार विजयी झाले. अनिता व्यतिरिक्त, मार्क कार्नी यांच्या मंत्रिमंडळात भारतीय वंशाच्या आणखी तीन जणांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये मनिंदर सिंधू यांना मंत्री करण्यात आले आहे तर रुबी सहोता आणि रणदीप सिंग सराई यांना राज्य सचिव बनवण्यात आले आहे. अनिता यांचे वडील तामिळनाडूचे होते तर आई पंजाबची होती. तथापि, अनिता यांचा जन्म आणि वाढ कॅनडाच्या ग्रामीण भागात असलेल्या नोव्हा स्कॉशियामध्ये झाली.
त्यांनी क्वीन्स युनिव्हर्सिटीमधून पॉलिटिकल सायन्समध्ये बॅचलर ऑफ आर्ट्स, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीमधून ज्युरिसप्रुडन्समध्ये बॅचलर ऑफ आर्ट्स, डलहौसी युनिव्हर्सिटीमधून लॉजमध्ये बॅचलर आणि टोरंटो युनिव्हर्सिटीमधून मास्टर ऑफ लॉज मिळवले.

# पाणीटंचाई गंभीर, खा. विरियातो यांची राजधानीत धडक

## पीडब्ल्यूडी अधिकाऱ्यांशी चर्चा | ८ दिवसांचा दिला अल्टीमेटम

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. १४ : राज्यातील विविध भागांत नळाद्वारे होणाऱ्या पाणीपुरवठ्याचा नियमित अभाव असून अनेक गावांमध्ये पाणीटंचाई गंभीर स्वरूप धारण करत आहे. या पार्श्वभूमीवर दक्षिण गोव्याचे काँग्रेस खासदार विरियातो फर्नांडिस यांनी बुधवारी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंत्यांची भेट घेऊन तातडीने उपाययोजना राबवण्याची मागणी केली.पुढील आठ दिवसांत आम्ही या प्रश्नाचा सखोल आढावा घेणार असून, त्यानंतर पुन्हा सरकारच्या निष्क्रियतेविरोधात आवाज उठवला जाईल, असे खासदार फर्नांडिस यांनी अधिकाऱ्यांशी बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना सांगितले.**



फर्नांडिस म्हणाले की, राज्यातील सर्वच मतदारसंघांमध्ये पाण्याची तीव्र टंचाई जाणवत आहे. नागरिकांना दोन-दोन दिवस पाण्याचा थेंबही मिळत नाही. काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्र्यांनी दररोज चार तास पाणीपुरवठा केला जाईल, असे सांगितले होते, मात्र यासाठी कोणतेही ठोस नियोजन सरकारकडे नाही.

पाण्याच्या नियमित आणि सुरळीत पुरवठ्यासाठी तातडीने आराखडा तयार करण्याची गरज असून, राज्य शासनाने याबाबत तत्काळ निर्णय घेण्याची मागणी त्यांनी केली.खासदार फर्नांडिस यांनी पाणीटंचाईच्या वाढत्या समस्येला मेगा प्रकल्प आणि आलिशान बंगल्यांना मिळणाऱ्या परवान्यांना जबाबदार धरले. स्वीमिंग पूलसाठी परवाने दिले जात आहेत, तर दुसरीकडे सामान्य लोकांना पिण्यासाठी पाणी मिळत नाही. यामुळे नैसर्गिक जलस्त्रोतांवर प्रचंड ताण येत आहे,असा आरोप त्यांनी केला.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन दिले होते, मात्र प्रत्यक्षात ओलिताखालील जमिनी कॅसिनो मालकांना विकल्या जात आहेत. ही दुर्दैवी आणि शेतकऱ्यांविरोधातील धोरणे आहेत असेही ते म्हणाले.

फर्नांडिस यांनी जलसंपदा खात्याच्या मंत्र्यांच्या स्वतःच्या शिरोडा मतदारसंघातील स्थितीवरही प्रकाश टाकला. शिरोडा व काणकोण भागांतील गावडोंगरीसारख्या खेड्यांमध्ये टँकरही पोहोचत नाहीत. सरकारकडे पाणीटंचाईविषयी कोणतेही स्पष्ट धोरण नाही. जलसंपदा मंत्र्यांच्याच मतदारसंघात पाणीटंचाई असतानाही त्याना वस्तुस्थिती माहीत नसावी हे दुर्दैव आहे असा आरोप त्यांनी केला.तसेच, निवडणुकांच्या काळात जाहिर करण्यात आलेली महिना १६ हजार लिटर मोफत पाणीपुरवठ्याची योजना स्थगित करण्यात आल्याची आठवणही त्यांनी करून दिली. निवडणुकीत लोकांना गोड गोड आश्वासने द्यायची आणि निवडणुका झाल्यावर योजना गुंडाळायच्या, हाच सरकारचा नेहमीचा प्रकार आहे,असा घणाघात त्यांनी केला.

### आमदार - खासदार आमने - सामने

**पेडणे तालुक्यातील पाणीटंचाईच्या प्रश्नावरून काँग्रेसचे खासदार विरियातो फर्नांडिस आणि भाजपचे आमदार प्रवीण आर्लेकर यांच्यात बुधवारी आल्तिनो येथील बांधकाम खात्याच्या कार्यालयाबाहेर शाब्दिक चकमक उडाली. पाणीटंचाईच्या मुद्द्यावरून बांधकाम खात्याच्या मुख्य अभियंत्यांची भेट घेतल्यानंतर माध्यमांशी संवाद साधतेवेळी आमदार प्रवीण आर्लेकर हे काही कामानिमित्त तेथे पोहोचले. यावेळी पत्रकारांशी बोलताना खा. फर्नांडीस सरकारवर टीका करत म्हणाले की , पेडणेमधील पाणीटंचाईचा प्रश्न देखील अजूनही सुटलेला नाही. लोकांना अद्यापही अडचणींचा सामना करावा लागत आहे. मात्र सरकार काहीच हालचाल करत नाही. खासदारांचे विधान ऐकून त्यांनी तत्काळ आक्षेप घेत पेडणेमध्ये कोणतीही पाणीटंचाई नाही, सर्व काही सुरळीत सुरू आहे, असा दावा प्रवीण आर्लेकर केला. यावर दोघांमध्ये शाब्दीक खटके उडाले.खासदार फर्नांडिस म्हणाले, पेडणेतील पाणी समस्या दूर झाल्याचा दावा चुकीचा आहे. मी स्वतः त्या भागात फिरून पाहणी केली आहे. धारगळसारख्या भागात पाण्याची स्थिती बिकट आहे. ओलिताखालील जमीन कॅसिनो मालकांना दिली जात आहे, त्यावर आमदार आर्लेकर काही का बोलत नाहीत?**
**ते पुढे म्हणाले,की, धारगळच्या जमिनीबाबत आर्लेकर तोंड उघडणार नाहीत. कारण ते स्वतः बिल्डर आहेत. शिवाय त्याना पुढच्या निवडणुकीत तिकीट हवे आहे . पेडणे आणि धारगळमधील परिस्थिती गंभीर आहे असे सांगत त्यांनी आर्लेकरांना खुल्या व्यासपीठावर चर्चेसाठी येण्याचे आव्हानही दिले.**

> **या सरकारकडे कुठलाच प्लान नाही. २४ तास पाणी सोडाच. परंतु आश्वासन दिल्याप्रमाणे ४ तास देखील पाणी हे सरकार जनतेला देऊ शकत नाही . कमांड एरियावरची आरक्षणे रद्द करून सरकार ओलीताखालच्या जमिनी भांडवलदारांच्या घशात घालत आहे. इथल्या 'नीज गोयकाराच्या' हक्काचे पाणी मेगा प्रकल्पाना जात आहे. पाणी मुबलक आहे असे सांगता, तर दोन चार दिवसांनी पाणी का देता?**
> **- कॅ. विरियातो फर्नांडीस (खा. दक्षिण गोवा)**

# पाणीटंचाईवरून बेतालभाटी ग्रामस्थांचा संताप

■ टीम दैनिक हेराल्ड

- **गावात पंधरवड्यापासून तीव्र पाणीटंचाई**
- **व्यावसायिक प्रकल्पांना मंजुरी**
- **जनतेच्या तक्रारींकडे दुर्लक्ष**

**मडगाव, दि. १४ :** बेतालभाटी गावात गेल्या पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर, स्थानिक पंचायतीने सार्वजनिक बांधकाम विभाग (पीडब्ल्यूडी), टाऊन अँण्ड कंट्री प्लॅनिंग (टीसीपी), जलसंपदा विभाग (डब्ल्यूआरडी) व इतर संबंधित सरकारी अधिकाऱ्यांवर ठपका ठेवत, या संकटाव वेळेवर आणि योग्य उपाययोजना करण्यात अपयश आल्याची तिखट शब्दांत टीका केली आहे.

उपसरपंच इल्मा डायस, पंच सदस्य व्हायोला पाचेको आणि इतर सदस्यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की, ग्रामस्थांनी दिलेल्या सार्वजनिक तक्रारींवर वेळेवर प्रतिसाद दिला जात नसून, पाणीटंचाईसारख्या गंभीर समस्यांकडे संबंधित यंत्रणा सतत दुर्लक्ष करत आहेत.

ग्रामस्थांनी पाण्याच्या समस्यांसाठी पंचायतवर बोट दाखवले तरी, सत्य हे आहे की, पंचायतीच्या अधिकारांवर आता मर्यादा आहेत. पाणीपुरवठा पीडब्ल्यूडी आणि डब्ल्यूआरडी हाताळतात, तर (टीसीपी) विभाग नव्या व्यावसायिक प्रकल्पांना मंजुरी देण्यावरच भर देतो, ज्यामुळे आधीच ताणाखाली असलेल्या संसाधनांवर अतिरिक्त भार पडतो, असे उपसरपंच डायस यांनी सांगितले.

सरपंच अँथनी फर्नांडिस यांनीही माध्यमांशी संवाद साधताना पंचायतीच्या धोरणात्मक भूमिकेची माहिती दिली. वीज, पाणी आणि मूलभूत सुविधा अपुरी असताना आम्ही प्रकल्पांना परवानग्या नाकारण्याचा निर्णय घेतला. मात्र, अधिकाऱ्यांकडून फायली परत पाठवून सचिवांवर मंजुरीसाठी दबाव टाकला जातो, अन्यथा निलंबनाची भीती दाखवली जाते, असा गंभीर आरोप त्यांनी केला.

गावातील पाणीपुरवठा पूर्ववत करण्यासाठी पंचायत सतत पाठपुरावा करत आहे, मात्र मिळणाऱ्या आश्वासनांवर विश्वास ठेवणे कठीण झाले आहे, असे पंच सदस्यांनी सांगितले. पाणीपुरवठा होत नाही, आणि ग्रामस्थांनी पंचायत सदस्यांना विचारणा करण्यासाठी फोन करणं सुरू केलं आहे, असे डायस म्हणाल्या. काही भागांमध्ये स्थानिक विहिरींमधून पाणी पुरवठा होत असला तरी, ही व्यवस्था दीर्घकाळ टिकणारी नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

फर्नांडिस यांनी सांगितले की, पाइपलाइन दुरुस्तीची प्रक्रिया देखील अपूर्ण आणि निष्काळजीपणाची आहे. दुरुस्ती केल्यानंतरही जोडणी योग्य नसते. परिणामी पाण्याचा दाब कमी राहतो आणि पाणी दुसऱ्या किंवा तिसऱ्या मजल्यांपर्यंत पोहोचत नाही, असा मुद्दा त्यांनी मांडला. गावात पायाभूत सुविधा अपुऱ्या असताना, मोठ्या व्यावसायिक प्रकल्पांना मंजुरी कशी दिली जाते? असा सवाल पंचायत सदस्यांनी उपस्थित केला. विकास नियोजन आणि वास्तवातील तफावत याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. ग्रामसभेने याआधीच रस्त्याच्या फलकांद्वारे गावाची वहनक्षमता संपली आहे असा संदेश देत नव्या व्यावसायिक प्रकल्पांना विरोध दर्शवला होता. हे फलक ग्रामस्थांवरील वाढत्या संसाधनांच्या ताणाची तीव्रता दाखवणारे ठरले.

पाण्याच्या कमतरतेचा प्रश्न केवळ बेतालभाटी पुरता मर्यादित नसून, मुरगाव तालुक्यातील अनेक भागांमध्येही पाणीपुरवठा खंडित झाल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. गेल्या दहा दिवसांपासून पाणीपुरवठा अपुरा आहे, ज्यामुळे नागरिकांचे दैनंदिन व्यवहार विस्कळीत झाले आहेत.

पीडब्ल्यूडी विभागाकडून वेर्णा पाइपलाइनमध्ये बिघाड झाल्याचे मान्य करण्यात आले आहे. दुरुस्ती सुरू असल्याचे सांगितले जात असले तरी, प्रत्यक्षात नागरिकांना पुरेसा आणि योग्य दाबाचा पाणीपुरवठा कसा मिळतो याची खात्री अधिकाऱ्यांकडून घेतली जात नाही, असा स्थानिकांचा आरोप आहे . विशेषतः उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे ही गरज आणखी वाढली आहे.

# शिरगाव चेंगराचेंगरी : मंदिर समितीने आरोप फेटाळले

■ टीम दैनिक हेराल्ड

### अध्यक्ष दीना गावकर यांचे स्पष्टीकरण

**डिचोली, दि. १४ :** श्री लईराई देवी मंदिर व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दीनानाथ दीना गावकर यांनी बुधवारी स्पष्ट केले की, ३ मे रोजी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरी प्रकरणावर राज्य सरकारने नेमलेल्या तथ्य शोध समितीचा अहवाल अद्याप समितीला प्राप्त झालेला नाही. तसेच, समितीने जिल्हा प्रशासनाला सहकार्य केले नाही, हे तथ्य शोध समितीचे आरोपही त्यांनी ठामपणे फेटाळून लावले.

वार्षिक जत्रोत्सवात झालेल्या दुर्घटनेनंतर मंदिर समितीवर विविध स्तरांतून टीका होत असताना, यासंदर्भात प्रतिक्रिया देताना गावकर म्हणाले की , मला अद्याप सरकारकडून तथ्य शोध समितीचा अहवाल मिळालेला नाही. तो कधी मिळेल, याचीही कल्पना नाही. मात्र, एकदा तो अहवाल हाती आल्यावर, त्याचा सखोल अभ्यास करून आम्ही योग्य त्या प्रतिक्रिया देऊ.ते पुढे म्हणाले, आम्ही जत्रा सुरळीत पार पाडण्यासाठी पूर्ण सहकार्य केले आहे. कोणत्याही टप्प्यावर आम्ही प्रशासनासोबत सहयोग करण्यात कमी पडलेलो नाही.

गावकर यांनी स्पष्ट केले की, अहवाल मिळाल्यानंतर समिती महाजनांशी सल्लामसलत करून पुढील निर्णय घेण्यात येईल.

दरम्यान, माजी मंदिर समिती अध्यक्ष गणेश गावकर यांनी सध्याच्या व्यवस्थापन समितीवर गंभीर आरोप करत त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. तथ्य शोध समितीने चेंगराचेंगरीला जबाबदार धरलेली समिती ही आता या पदावर राहण्यास नैतिकदृष्ट्या अपात्र आहे. त्यांनी तत्काळ राजीनामा द्यावा, अशी भूमिका त्यांनी मांडली. गणेश गावकर यांनी सध्याच्या समितीच्या कामकाजाशी संबंधित तपशील देखील सादर केल्याचे कळते.

४ सदस्यीय तथ्य शोध समितीने ३ मे रोजी पहाटे झालेल्या चेंगराचेंगरीसाठी श्री लईराई देवी मंदिर समिती, जिल्हा प्रशासन, जिल्हा पोलिस, शिरगाव ग्रामपंचायत आणि जमाव या सर्वांना सामूहिकपणे जबाबदार धरले आहे. या अहवालात मंदिर व्यवस्थापन समिती बरखास्त करण्याची आणि मंदिराच्या कारभारासाठी प्रशासक नेमण्याची शिफारसही करण्यात आली आहे.या दुर्घटनेत सहा जणांचा मृत्यू झाला होता, तर १०० हून अधिक भाविक जखमी झाले होते.

# शेल्डेमधील शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान!

## साळवली धरणातून पाणी मिळाले नाही | कसे होणार आत्मनिर्भर ?

■ **गौरेश सत्तरकर**
*टीम दैनिक हेराल्ड*

**कुडचडे, दि. १४ :** साळवली धरणातील पाणी सिंचनासाठी उपलब्ध झाले नसल्यामुळे शेल्डे आणि परिसरातील शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, अनेकांचे पीक वाया गेले आहे. सलग कोरड्या पडलेल्या कुडचडे शाखा कालव्यातून पाणी पोहोचलेच नसल्याने पेरलेले बियाणे सुकून गेले आहे. तर काही ठिकाणी उंदरांनी बियाण्याची नासधूस केली आहे.

शेल्डेचा हा संपूर्ण भाग साळवली धरणाच्या कुडचडे शाखा कालव्याशी सुमारे ३.५ किमी लांबीच्या पाईपलाईनने जोडलेला असला तरी, पाण्याचा प्रवाह अत्यल्प आहे. त्यामुळे शेतजमीन कोरडीच राहिल्याने शेतकऱ्यांना पेरणीसाठी आवश्यक असलेली आर्द्रता मिळू शकलेली नाही. परिणामी, शेतकऱ्यांचे नुकसान दिवसेंदिवस वाढत आहे.







शेल्डेमधील शेतकरी संजय गावस देसाई यांनी सांगितले की, त्यांनी अलीकडेच देवस्थानच्या २० एकर जमिनीवर पेरणी केली होती. ही जमीन त्यांनी दरवर्षी दोन लाख रुपयांना भाडे तत्वावर घेतली असून यंदाच्या हंगामासाठी विविध प्रकारच्या भाजीपाला बियाण्यांवर १० हजार रुपये खर्च केले होते. मात्र पाण्याअभावी बियाणीच उगवली नाहीत. त्याचबरोबर गवत उत्पादनासाठी केलेल्या पेरणीत आणखी २५ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे त्यांनी नमूद केले. एकूण नुकसान सुमारे १५ लाख रुपयांपर्यंत पोहोचल्याचा त्यांचा दावा आहे.

पाणीटंचाईमुळे ऊस शेती करणारे इतर शेतकरीही मोठ्या अडचणीत आले आहेत. स्थानिक रहिवासी प्रशांत देसाई यांनी सांगितले की, सिंचनाची व्यवस्था नसल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी पेरणीच थांबवली आहे.

पान २ ▶

> **एप्रिलपासून आम्ही मुख्यमंत्री, जलसंपदा विभाग आणि संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार निवेदने दिली, पण अजूनपर्यंत कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. कार्यालयातून कार्यालयात पाठवले जाते, पण कोणीही जबाबदारी घेत नाही,**
> **जर तात्काळ पाणी सोडण्यात आले नाही, तर मी केपे येथील उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन छेडणार आहे.**
> **- संजय गावस देसाई**